# महाराष्ट्र शासन

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर

### नगर परिषदामध्ये राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहीरात.

क्र. कार्या १०/ नपाप्र / टे २/ संवर्ग भरती /६३३/२०१२, दिनांक २१.१२.२०१२

.जाहिरात क्र.१/२०१२

अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक :- ५ /१/२०१३

परिक्षा दिनांक :- १३/१/२०१३

मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्र.नपप्रस / कक्ष-५/ संवर्ग / श्रेणी-क /२०११, दिनांक ३१.१.२०११ अन्वये जिल्हाधिकारी , चंद्रपुर यांचेअधिनस्त नगर पालिका कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गातील नगर परिषदेच्या आस्थापनेवरील श्रेणी-क - १ व श्रेणी -क-२ मधील सरळसेवेची रिक्त पदे जिल्हानिवड समिती, चंद्रपुर मार्फेत सरळसेवेने भरण्याकरिता खुल्या व मागास प्रवर्गातील पात्र उमेदवाराकडुन खालील अटीच्या अधिन राहुन लेखी स्पर्धा परिक्षेकरिता ५ जानेवारी २०१३ रोजी सायं. ५.४५ वाजेपर्यंत ( Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. Online व्यतिरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

जाहिरात व अर्जाचा नमुना www.chanda.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे . नगर पालिका कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गातील नगर परिषदेच्या आस्थापनेवरील श्रेणी-क-१ व २ संवर्गात उपलब्ध पदांचा तपशिल.

१. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क)

वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००, एकुण पदे -६

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| विजा/भजअ ब क ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| एकुण | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ५ | ६ |

२. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क)

वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००, **एकुण पदे -५**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| **एकुण** | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ५ |

३. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक) (श्रेणी-क)

वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००, **एकुण पदे -५**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| **एकुण** | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ५ |

४. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद , जलदाय पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रीकी सेवा (श्रेणी-क)

वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००, **एकुण पदे -९**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| विजा/ भज अ ब क ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | १ | ५ |
| **एकुण** | ९ | २ | १ | ० | ० | ० | १ | ५ | ९ |

५. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद , लेखा व लेखा परिक्षण सेवा (श्रेणी-क)

वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००, **एकुण पदे - ५**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| **एकुण** | **५** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | **५** |

६. पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद , अग्निशमन सेवा (श्रेणी-क- २)

वेतनश्रेणी ५२००-२०२०२०० ग्रेड पे २८००, **एकुण पदे - १**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** |

टिप :- १. वर नमुद केलेल्या पदाच्या संख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असुन पदांची संख्या, समांतर आरक्षण , सामाजीक आरक्षण याबाबत बदल करणे व रदद करणे तसेच भरती प्रक्रिया कोणत्याही प्रशासकीय कारणास्तव रद्द व पुढे ढकलण्याचे किंवा त्यात फेरबदल करण्याचे सर्वाधिकार जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे कडे राखीव राहील. आणि याबाबत अर्जदारांना कोणताही दावा करता येणार नाही.

२. महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यास प्रवर्गातील पुरुष उमेदवारा मधुन पद भरण्यात येईल.

३. (१) महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे २००१ मधिल तरतुदी नुसार अधिन राहील.

(२) खुल्या प्रवर्गातील महिला करिता शासकीय , निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थामध्ये ठेवण्यात आलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलती करीता शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र. ८२/२००१/ मसेआ/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे २००१ अंतर्गत तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे परिशिष्ट -३ मधील क्रिमीलीअर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

(३) माजी सैनिक उमेदवाराकरीता :- माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदाकरिता आवेदन पत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणुन शासन सेवेतील पात्र उमेदवार असावा. माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवुन शासकीय सेवेत नौकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास शासन निर्णय क्र. आरटीए-१०९०/ प्र.क्र.६ / ९३/१२ दिनांक ८ जुन १९९३ नुसार पात्र राहणार नाही.

(४) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरिता :- अंशकालीन पदवीधारक / पदवीकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील अद्यावत नोदणी केलेली असावी.अंशकालीन पदविधर उमेदवारांनी समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवुन शासकीय सेवेत नौकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास शासन पत्र क्र. पअक-१०१०/ ७१७/ प्र.क्र. ३२२/१०/१६ -अ, दिनांक २६ ऑगष्ट २०१० नुसार पात्र राहणार नाही.

(५) स्वातंत्र्य सैनिक उमेदवारांकरिता :- स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशीत पाल्यांना आरक्षण नसुन नियुक्तीकरीता पसंती क्रम आहे. त्यामुळे जाहिराती नुसार अर्ज करतांना तसे अर्जात नमुद करुन नामनिर्देशीत असावे.

३. **राज्यस्तरीय संवर्ग श्रेणी -क व श्रेणी -क २ या पदासाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी :-**

| पदाचा संकेतांक | पदाचे नांव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी -क) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी. (बि.ई. सिव्हील)किंवा पदविका (डी.ई. सिव्हील) आवश्यक.<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |
| २ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (विद्युत) (श्रेणी -क) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी. (बि.ई. विद्युत ) किंवा पदविका (डी.ई. विद्युत ) आवश्यक.<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |
| ३ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक) (श्रेणी -क) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी. (बि.ई.संगणक) किंवा पदविका (डी.ई. संगणक) आवश्यक.<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |
| ४ | महाराष्ट्र नगर परिषद , जलदाय , मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रीकी सेवा (श्रेणी -क) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रीकी / पर्यावरण अभियांत्रीकी पदवी. (B.E. Mechanical / Environmental ) किंवा यांत्रिकी / पर्यावरण पदविका (D.E. Mechanical Environmental ) आवश्यक.<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्र नगर परिषद , लेखापरिक्षण व लेखापाल सेवा (श्रेणी-क )<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १. मान्यता प्राप्त विद्यापिठाची वाणीज्य शाखेची पदवी आणि Member of Institution of Cost and work Accounts ( I.C.W.A.) किंवा सनदी लेखापाल (Chartered Accountant ) असणे आवश्यक.<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |
| ६ | महाराष्ट्र नगर परिषद , अग्निशमन सेवा (श्रेणी-क-२ )<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | १. मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक आहे.<br>२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय , नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub offcers Course) आवश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेशे ज्ञान आवश्यक . |

४. <u>वयोमर्यादा</u> :-

१. शासन निर्णय दिनांक १७ ऑगष्ट २००४ मधील तरतुदीनुसार वरील सर्व पदांसाठी उमेदवारांचे वय दिनांक ३०.११.२०१२ रोजी १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे (खुल्या प्रवर्गासाठी असावे.)

२. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथील क्षम .

३. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता कमाल ३८ वर्षापर्यंत .

४. शासन निर्णय दिनांक २८.५.९२ नुसार माजी सैनिक यांना सशस्त्र दलात झालेली सेवा अधिक ३ वर्षे इतका कालावधी सुट देण्यात येईल.

५. शासन निर्णय दिनांक ३.२.२००७ नुसार प्रकल्प ग्रस्त उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

६. पदविधर अंशकालीन उमेदवारासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २०.८.२००५ अन्वये पदविधर अंशकालीन म्हणुन किमान ३ वर्षे काम केलेल्या व ३ वर्षाच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील. अंशकालीन म्हणुन काम केलेल्या ३ वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र तहसिलदार यांच्या सहीचे असावे.

७. शासन निर्णय दिनांक ३०.११.९८ नुसार जनगणना कर्मचा-यांना जनगणना कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्षे एवढी कमाल मर्यादा शिथील राहील.

८. विहीत अर्हता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही. विहीत वयोमर्यादा नसलेल्या उमेदवाराचे अर्ज स्विकृत केले जाणार नाही.

**५. अधिवास :-** अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत शासनाने प्राधीकृत केलेल्या सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

**६. भरतीप्रक्रिया :-**

१. अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सुचना.

उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहित केलेला अर्ज www.chanda.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. त्यावर असलेल्या अर्जात माहिती भरुन अपलोड करुन सादर करावा व प्रिंट आऊट काढुन घ्यावी व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपुन ठेवावा. आनलाईन आनलाईन अर्ज भरायला सुरुवात करण्याअगोदर परीक्षा शुल्क बँक चालान व्दारे भरणे आवश्यक आहे. बँक चालान चा नमुना www.chanda.nic.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट करुन घ्यावा व त्यातील आवश्यक माहिती भरुन परीक्षा शुल्क नमुद केलेल्या बँकेत जमा करावे. या नंतरच आनलाईन अर्ज भरावा.

२. उमेदवाराला कोणेतेही इंटरनेट कॅफे , उपलब्ध असलेल्या इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल.

३. उमेदवारांनी माहिती भरण्यापुर्वी बँक चालान तयार करुन सोबत ठेवावा. म्हणजे चालान बाबतची माहिती आवेदन पत्रावर भरता येईल. त्याशिवाय इंटरनेटवर अर्ज भरता येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. परिक्षा प्रवेशपत्र उमेदवारास www.chanda.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदनी क्रमांक जपुन ठेवावा.परीक्षा प्रवेशपत्र दिनांक ८ /१/२०१३ पासुन उपरोक्त संकेतस्थळावरुन उपलब्ध होईल. प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यास काही अडचणी निर्माण झाल्यास दिनांक १२/१/२०१३ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे कार्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षातुन प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. लेखी परीक्षेकरीता कोणत्याही परिस्थितीत प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केंद्रात प्रवेश दिल्या जाणार नाही.

५. परीक्षा प्रवेश व परीक्षेविषयी माहिती ही www.chanda.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननी शिवाय बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार परिक्षा पास झाल्यानंतर प्रवर्ग निहाय गुणानुक्रमे उमेदवाराच्या कागदपत्राची तपासणी केल्यानंतर तात्पुर्ती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परिक्षा पास झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधित पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासुनच अर्ज सादर करावा.

७. परिक्षा शुल्क :-

खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रुपये २००/- ( अक्षरी दोनशे फक्त.) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये १००/- (अक्षरी शंभर फक्त.) इतके परिक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदरचे शुल्क बँक चालानच्या स्वरुपात अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, तथा जिल्हाधिकारी,चंद्रपुर यांचे नांवाने स्टेट बॅक ऑफ इंडिया कुठल्याही शाखेत चालान व्दारे खाते क्रमांक ३२५३१३७३०१७ जमा करणे आवश्यक आहे. सदर परिक्षा शुल्क ना परतावा राहील. माझी सैनिकाकरिता परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यक्ता नाही.

८. परिक्षेचे स्वरुप व निवळ पध्दती :-

| पदाचा संकेतांक | पदनाम | परिक्षेसाठी गुण | |
|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | मुलाखत |
| १ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| २ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ३ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ४ | महाराष्ट्र नगर परिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ५ | महाराष्ट्र नगर परिषद लेखापरिक्षण व लेखापाल सेवा (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ६ | महाराष्ट्र नगर परिषद अग्निशमन सेवा (श्रेणी-क-२) | २०० | २५ |

९. परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-

१. महाराष्ट्र नगर परिषद कर्मचारी संवर्गातील श्रेणी -क या पदासाठी लागु असलेल्या शैक्षणीक पात्रतेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

२. महाराष्ट्र नगर परिषद कर्मचारी संवर्गातील श्रेणी -क या पदासाठी २०० गुणाची लेखी परिक्षा व मुलाखत २५ गुणाची राहील.

३. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल त्यासाठी १०० प्रश्नांना प्रत्येकी २ गुण याप्रमाणे २०० गुण असतील १०० प्रश्नापैकी ५० प्रश्न संबंधित सेवेच्या पदाच्या आवश्यक शैक्षणीक पात्रतेच्या स्तरावरील दर्जाचे असतील. उर्वरीत ५० प्रश्न मराठी , इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणीशी निगडीत असतील. निगटीव्ह मार्कींग पध्दत असणार नाही. लेखी परिक्षा दिनांक १३.१.२०१३ रोजी घेण्यात येईल. लेखी परिक्षेमधुन पात्र होणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचा दिनांक नंतर कळविण्यात येईल.

४. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी व तोंडी परिक्षेत समान गुण धारण करणारा उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णय क्र.प्रानिम- २००७/ प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन २००८ मध्ये दिलेल्या सुचनांच्या अधिन राहुन निवड केली जाईल.

५. लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी www.chanda.nic.in या वेबसाईटवर व जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटिस बोर्डावर लावुन प्रसिध्द करण्यात येईल.

६. लेखी परिक्षा चंद्रपुर येथील परिक्षा केंद्रावर घेण्यात येईल याबाबतच्या सुचना खालील प्रमाणे आहेत. परिक्षेचा दिनांक १३/१/२०१३ राहील.

## १०. नियम व अटी :-

१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यापासुन ते नियुक्तीनंतरही कोणतेही क्षणी उमेदवाराने अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती लपवुन ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२. प्रथमच शासन सेवेत निवड व नियुक्त होणा-या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) योजना लागु राहील.

३. निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्याकडे वशिला लावण्याचा प्रयत्न अगर कोणताही दबाब (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष) आणल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल.

४. सदर परिक्षेसाठी विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज फक्त Online व्दारेच स्विकारले जातील.

५. उमेदवार जर प्रत्यक्षात एखाद्या कार्यालयीन आस्थापनेवर कार्यरत असल्यास त्याची योग्य मार्गाने नाहरकत वजा अर्ज सादर केला पाहीजे.

६. परीक्षेसंबंधी सर्व सुचना www.chanda.nic.in प्रसिध्द केल्या जाईल. निवड झाल्यानंतर पात्र / अपात्र उमेदवाराची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. पात्र झालेल्या उमेदवारास कागदपत्र तपासणी तसेच मौखीक चाचणीसाठी बोलाविण्याच्या सुचना सुध्दा वेबसाईटवरच प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कुठलाही पत्रव्यवहार करता येणार नाही . याची नोंद घ्यावी.

७. निवड होवुन नियुक्ती झालेल्या उमेदवारांना शासन निर्णयानुसार लागु असलेल्या सर्व विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना नियमानुसार बंधपत्र भरुण देणे , वैद्यकीय चाचणी करुन घेणे बंधनकारक राहील.

८. उमेदवारास परिक्षेस/ मुलाखतीस येण्याजाण्याचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

९. विद्यमान भरती प्रक्रिया करीता प्राप्त होणारे सुधारीत शासन निर्णय, न्यायालयीन आदेश यांच्या अधिनतेने राहील. निवड झालेल्या उमेदवारांना पोलीस विभागाकडुन चारित्र्य व पुर्वेतिहास बोलविण्यात येईल तो अनुकुल असल्याशिवाय संबंधीत उमेदवार नियुक्तीस पात्र राहणार नाही.

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | भरती प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा | दिनांक २२.१२.२०१२ ते ५.१.२०१३ सायं. ५.४५ पर्यंत |
| २ | बँकेत विहीत चलानाव्दारे परिक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम | दिनांक ५.१.२०१३ |
| ३ | लेखी परिक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक ८.१.२०१३ ते १३.१.२०१३ |
| ७ | लेखी परिक्षा दिनांक व वेळ | दिनांक १३.१.२०१३<br>दुपारी ११.०० ते १.०० वाजता पर्यंत |

विशेष सुचना :- या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्राची आवश्यक्ता नाही तरीही ज्या उमेदवाराकडे पदाकरिता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विणाकारण अर्ज भरु नये. भरतीसंबंधी सर्व सुचना www.chanda.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. कोणत्याही उमेदवारासोबत पत्रव्यवहार केला जाणार नाही. कोणत्याही उमेदवारांनी पोष्टाव्दारे या कार्यालयास अर्ज पाठवु नये. ज्या उमेदवारांची निवड होईल त्याच उमेदवारांची कागदपत्र तपासणीचे दिवशी इंटरनेटवरुन काढलेल्या अर्जाचा नमुना तसेच चलानची १ प्रत सादर करणे आवश्यक राहील.

दिनांक :- २१.१२.२०१२

स्थळ :- चंद्रपुर

अध्यक्ष

जिल्हा निवड समिती तथा

जिल्हाधिकारी ,चंद्रपुर